मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहराला दररोज पाणीपुरवठा अशक्य

## शहरात दिवसाआडच पाणीपुरवठा सुरू राहणार : महापालिका आयुक्तांची भूमिका

**पिंपरी | प्रतिनिधी**

‘पिंपरी-चिंचवड शहराला सध्या दररोज पाणीपुरवठा करणे शक्य नाही. त्यामुळे शहरात दिवसाआडच पाणीपुरवठा सुरू राहणार आहे,’ असे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी शुक्रवारी स्पष्ट केले.

पिंपरी-चिंचवडला २५ नोव्हेंबर २०१९ पासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. पण, ज्या दिवशी पाणी येणार असते, त्याही दिवशी शहरातील अनेक भागांत अपुरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी वारंवार येत आहेत. त्यातच आता उन्हाळा वाढताच शहरातील सर्वच भागांतून पाण्याच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी येऊ लागल्या आहेत. जनसंवाद सभेतही या तक्रारी आल्या. त्या संदर्भात पत्रकारांशी बोलताना, त्यांनी पाणीपुरवठ्याविषयी माहिती दिली.



‘सध्या दररोज पाणीपुरवठा करणे शक्य नाही. शहरामध्ये पाण्याचा तुटवडा जाणवत आहे. ‘एमआयडीसी’कडून २० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणीपुरवठा होत आहे. पूर्वी तो ३० एमएलडी होता. तर, आंद्रा धरणातून ८० एमएलडी पाणी उचलण्यात येत आहे. जलसंपदा विभागाची ७३ कोटी रुपयांची पाणीपट्टी भरण्यात आली आहे. अद्याप ६० कोटी रुपये बाकी असून, त्याबाबत निर्णय व्हायचा आहे. जलसंपदा विभागाने महापालिकेला पाणी देताना औद्योगिक दर आकारला आहे. पाण्याचे अन्य स्रोत शोधण्याचे काम सुरू आहे. मुळशी धरणासह इतर दोन ठिकाणांहून पाणी घेण्यासाठी बैठक झाली आहे. जलसंपदा विभागाच्या सूचनेनुसार पाण्याचे लेखापरीक्षण करण्याची तयारी आहे,’ असे सिंह यांनी स्पष्ट केले.

‘भामा आसखेड जलवाहिनी प्रकल्पाचे काम प्रगतिपथावर आहे. भूसंपादन पूर्ण झाले आहे. जलवाहिनी टाकण्यासाठी संपूर्ण भूसंपादन करण्याची आवश्यकता नाही. कारण, जमिनीखालून जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. त्या जागेवर शेतकरी शेती करू शकतात. त्या सर्व बाबींची पूर्तता करण्यात आली आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर शहरासाठी डिसेंबरअखेर किंवा २०२६ च्या सुरुवातीला अतिरिक्त पाणी मिळेल,’ असेही आयुक्त सिंह यांनी सांगितले.

### पाणीपुरवठा तीन एप्रिलला बंद

» जलशुद्धीकरण केंद्र आणि क्षेत्रीय स्तरावरील पाणीपुरवठा व विद्युतविषयक दुरुस्तीची विविध कामे हाती घेतली जाणार आहेत. त्यामुळे तीन एप्रिल रोजी सकाळचा पाणीपुरवठा नियमित वेळेनुसार होणार आहे. तर, संध्याकाळचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. पाणीपुरवठा यंत्रणा बंद ठेवल्यामुळे चार एप्रिल रोजी सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होणार असल्याचे पाणीपुरवठा विभागाने सांगितले.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत ‘उद्योग सुविधा कक्ष’

## ‘उद्योग सुविधा कक्षा’मुळे स्थानिक गुंतवणूक आणि औद्योगिक विकासाला वेग मिळेल

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका आणि स्थानिक उद्योजकांमध्ये संवाद वाढावा, उद्योगांना भेडसावणाऱ्या समस्यांचे तत्काळ निराकरण व्हावे, तसेच औद्योगिक आणि आर्थिक गुंतवणुकीला चालना मिळावी, यासाठी महापालिकेने ‘उद्योग सुविधा कक्ष’ स्थापन केला आहे.

औद्योगिक गुंतवणुकीस अनुकूल वातावरण निर्माण करणे, व्यापारी, उद्योजक व कामगार संघटनांशी संवाद साधून स्थानिक पातळीवरील अडचणी समजून घेणे व त्याचे निराकरण करणे, गुंतवणूकदार-उद्योजकांना प्रशासनाशी समन्वय साधून आवश्यक कायदेशीर व प्रशासकीय सहकार्य या कक्षाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

एक खिडकी योजना, उद्योग-सारथी संकेतस्थळ सुरू करण्यात आले आहे. व्यापारी, उद्योग संघटनांसाठी तक्रार निवारण संकेतस्थळ कार्यान्वित करण्यात आले आहे. याद्वारे उद्योग-धंदा परवाना, तसेच इतर स्थानिक सुविधा व सेवांबाबतच्या तक्रार नोंदविता येईल. उद्योगांकडून सूचना मागविण्यात येणार आहेत.



उद्योग प्रतिनिधी आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांमध्ये मासिक बैठकांचे आयोजन करून स्थानिक समस्यांवर चर्चा व त्यांचे निराकरण केले जाणार आहे. आयुक्त स्तरावर त्रैमासिक बैठकांचे आयोजन केले जाणार आहे. त्यात एमआयडीसी, पोलीस प्रशासन आणि राज्य शासनाशी समन्वय साधून आवश्यकतेनुसार धोरणात्मक चर्चा केली जाणार आहे.

उद्योग क्षेत्रातील गुंतवणूकदार उद्योजकांसाठी पोलीस प्रशासनाबरोबर आवश्यक समन्वय आणि त्रैमासिक बैठकांचे आयोजन केले जाणार आहे. व्यवसायसुलभता वाढवण्यासाठी नियमांचे पालन आणि गुंतवणुकीस सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महापालिकेच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांमध्ये (सीएसआर) उद्योगांचा सहभाग वाढवण्यासाठी विशेष उपक्रम, मध्यम व लघुउद्योगांसाठी महापालिकेचे ऑटो क्लस्टर व इतर औद्योगिक संस्थांसोबत समन्वय साधून तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. कामगार आणि उद्योजकांसाठी शासकीय कल्याणकारी योजना, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक विकास या संदर्भात माहिती व सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.

‘उद्योग सुविधा कक्ष’ हा स्थानिक उद्योग व प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा ठरेल. या उपक्रमामुळे गुंतवणूकदारांना पारदर्शक व वेगवान सेवा मिळेल आणि व्यवसाय सुलभतेला चालना मिळेल. महापालिकेच्या विविध विभागांशी समन्वय साधून औद्योगिक अडचणी सोडवण्यासाठी हा कक्ष प्रभावी भूमिका बजावेल, असे आयुक्त शेखर सिंह म्हणाले.

# गुढी पाडव्याला हापूस आवाक्याबाहेर

## बाजारात आंब्यांची आवक कमी : डझनाचे हापूसचे दर 800 ते 1500 रुपयांपर्यंत दर

**पुणे | प्रतिनिधी**

साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या गुढी पाडव्याला आंब्यांना मागणी वाढते. यंदा वातावरणातील बदलांमुळे आंबा लागवड कमी प्रमाणावर झाली असून, नेहमीच्या तुलनेत बाजारात आंब्यांची आवक कमी होत आहे. त्यामुळे दर चढे असून, डझनाचे हापूसचे दर ८०० ते १५०० रुपयांपर्यंत आहेत. गेल्या वर्षी गुढी पाडव्याला हापूसचे दर ५०० ते ७०० रुपयांपर्यंत होते.



गुढी पाडव्याला आंब्यांची खरेदीही मोठ्या प्रमाणावर होते. यंदा आंब्यांची आवक अतिशय कमी प्रमाणावर झाली आहे. नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यात कोकणात अपेक्षित थंडी पडली नाही. त्यामुळे मोहोर गळून पडल्याने आंबा लागवडीवर परिणाम झाल्याची माहिती श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील आंबा व्यापारी युवराज काची आणि अरविंद मोरे यांनी दिली.

मार्च महिन्यात आंब्यांची आवक वाढते. साधारणपणे कोकणातून दररोज चार ते पाच हजार पेट्यांची आवक मार्केट यार्डातील फळबाजारात होते. सध्या बाजारात दररोज एक ते दोन हजार पेटी आंब्यांची आवक होत आहे. गुढी पाडव्यामुळे आंब्यांना मागणी राहणार आहे. सध्या कच्च्या आंब्याच्या चार ते आठ डझनाच्या पेटीला प्रतवारीनुसार २५०० ते सहा हजार रुपये दर मिळाले आहेत, असे त्यांनी सांगितले.

### आंबा हंगामाची लवकर अखेर

» यंदा आंब्यांची आवक कमी प्रमाणावर होत आहे. १० एप्रिल ते १० मे या कालावधीत आंब्याची आवक वाढणार आहे. पुढील महिन्यात आंब्यांच्या दरात घट होण्याची शक्यता आहे. दरवर्षी हापूसचा हंगाम जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत सुरू असतो. यंदा पहिल्या बहरातील आंब्याच्या लागवडीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे आंब्याचा हंगाम लवकर संपण्याची शक्यता असल्याचे आंबा व्यापारी युवराज काची आणि अरविंद मोरे यांनी सांगितले.

# 2100 रुपयांसाठी पाच वर्षे प्रतीक्षा; डॉ. गोऱ्हे

## योग्य वेळ येताच ते होईल : ‘लाडकी बहीण’बाबत उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचे विधान

**पिंपरी | प्रतिनिधी**

‘लाडकी बहीण योजनेत २१०० रुपये कधी देणार हे कधीच कोणी सांगितले नव्हते. राज्य सरकारचा पहिलाच अर्थसंकल्प झाला आहे. त्यामुळे महिलांना २१०० रुपये कधी मिळणार हे आताच सांगता येणार नाही. त्यासाठी पाच वर्षे वाट पाहायला लागेल. योग्य वेळ येताच ते होईल,’ असे वक्तव्य विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले. ‘विधिमंडळात कुठल्या प्रकारची भाषा वापरली पाहिजे, याचे सदस्यांना भान राहिलेले नाही,’ अशी टिप्पणीही त्यांनी केली.



विधिमंडळाचे अधिवेशन ३ ते २६ मार्च या कालावधीत झाले. विधिमंडळात झालेल्या कामकाजाविषयी डॉ. गोऱ्हे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. त्या म्हणाल्या, ‘विधान परिषदेत एकूण ११५ तास, तर विधानसभेत एकूण १४६ तास कामकाज झाले. विविध विषयांवर प्रश्नोत्तरे, चर्चा झाली. तसेच, अहिल्याबाई होळकर जन्म त्रिशताब्दी, महिला पंचदशकपूर्तीनिमित्त ठराव, राज्यघटनेला ७५ वर्षे या विषयावर ठराव करण्यात आले.’

‘लोकसभेसारखेच निकाल विधानसभेत येण्याची शक्यता होती. मात्र, तसे झाले नाही. पूर्वी सरकार स्थापनेनंतर दोन वर्षांनंतर विरोधी पक्षांची आंदोलने व्हायची. आता विरोधकांनी सुरुवातीपासूनच आक्रमक भूमिका घेतली. विधिमंडळात महिलांबाबत अपशब्द वापरण्यासारखे प्रकार झाले. विधिमंडळात हीन प्रवृत्तीची भाषणे ऐकली. त्यातून काहींचा हिरोगिरी करण्याचा हेतू असू शकतो. मात्र, कोणत्या शब्दांचा वापर करू नये, याचे भान असल्याचे दिसत नाही. याबाबत मतदारांनीच प्रश्न विचारले पाहिजेत. काही लोकांनी वातावरण गढूळ केले आहे,’ असे मत डॉ. गोऱ्हे यांनी मांडले.

महिलांचे राजकीय सक्षमीकरण आवश्यक आहे. त्यासाठी काही जिल्ह्यांत दौरा करून संबंधित विभागांच्या कामांचा आढावा घेणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, पुण्यातील शिवाजीनगरचे नामकरण छत्रपती शिवाजी महाराज नगर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री, पुणे महापालिका आयुक्तांना दिले आहेत, असे त्यांनी सांगितले.

### ते विधान ‘हक्कभंग’ पात्र

» महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज्य ठाकरे यांनी विधानसभेत सर्वच खोक्याभाई असल्याचे काही दिवसांपूर्वी विधान केले होते. याबाबत विचारले असता, ‘हे विधान हक्कभंगासाठी पात्र होऊ शकते’ असे डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केले.

### ‘स्टँड-अप’बाबत नियमावली

» विधिमंडळ अधिवेशन काळातच कुणाल कामरा प्रकरण घडले. या अनुषंगाने डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, ‘ओटीटीसंदर्भात केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचना आहेत. मात्र, स्टँडअप कॉमेडी आणि ओटीटीबाबत राज्य सरकारचे धोरण नाही. स्टँडअपमध्ये महिलांबाबत असभ्य विनोद होतात. त्यामुळे या संदर्भात नियमावलीबाबत मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले आहे.’

# ...तोपर्यंत पोलिसांच्या नोकऱ्या अबाधित

## एआयद्वारे एफआयआर दाखल करण्याच्या प्रश्नावर पोलीस आयुक्तांचे मजेशीर उत्तर; नागरिकांशी साधला डिजिटल संवाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी नागरिकांशी एक्स या सोशल मीडियावरून नागरिकांशी संवाद साधला. शहरातील वाहतूक समस्या, महिला सुरक्षा, सायबर गुन्हे, कायदा व सुव्यवस्था अशा विविध विषयांवर नागरिकांनी प्रश्न विचारले. त्यामध्ये एका गमतीशीर प्रश्नाचे उत्तर पोलीस आयुक्तांनी अतिशय गमतीशीर दिले.

पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी नागरिकांशी एक्स या सोशल मीडियावरून नागरिकांशी संवाद साधला. शहरातील वाहतूक समस्या, महिला सुरक्षा, सायबर गुन्हे, कायदा व सुव्यवस्था अशा विविध विषयांवर नागरिकांनी प्रश्न विचारले. त्यामध्ये एका गमतीशीर प्रश्नाचे उत्तर पोलीस आयुक्तांनी अतिशय गमतीशीर दिले. पोलीस एआय जनरेटेड एफआयआर दाखल करणार का, असा मजेशीर प्रश्न एका व्यक्तीने उपस्थित केला. त्यावर पोलीस आयुक्त म्हणाले, एफआयआर दाखल करण्यासाठी दोन्ही बाजूंची तक्रार समजून घेणे आवश्यक आहे. जोपर्यंत एआय दोन्ही बाजूंची तक्रार समजून घेत नाही तोपर्यंत आम्हा पोलिसांच्या नोकऱ्या अबाधित आहेत.



### चारित्र्य पडताळणी संबंधात तक्रारींसाठी विशेष क्रमांक

» पासपोर्ट काढताना संबंधित अर्जदाराची चारित्र्य पडताळणी केली जाते. या प्रक्रियेत वेळ जात असून त्यासंबंधात काही तक्रारी असल्याचे चर्चेत सांगण्यात आले. त्यावर पोलीस आयुक्तांनी सविस्तर उत्तर दिले. पासपोर्ट संदर्भात येणाऱ्या कोणत्याही अडचणींबाबत पोलिसांकडून सहकार्य मिळवण्यासाठी ८०८७७०५११२ हा विशेष क्रमांक जारी केला आहे. यावर नागरिकांनी पासपोर्ट चारित्र्य पडताळणीसाठी येणाऱ्या तक्रारी मांडण्याचे आवाहन आयुक्तांनी केले.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी आपला दोन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला आहे. कार्यकाळ पूर्ण करणारे चौबे हे पहिले पोलीस आयुक्त ठरले आहेत. मागील वर्षीप्रमाणे त्यांनी यावर्षीही पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील नागरिकांशी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून संवाद साधला. शहरातील गुन्हेगारी, कायदा व सुव्यवस्था, वाहतूक, पोलीस आणि पोलीस आयुक्तालयाचे बळकटीकरण अशा विविध विषयांवर चौबे यांनी संवाद साधला.

पिंपरी-चिंचवड शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. पिंपरी-चिंचवड शहरात ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्या आधारे देखील पोलिसांकडून कारवाई केली जात आहे. रात्री उशिरापर्यंत वाढदिवसाचे सेलिब्रेशन यावर एका व्यक्तीने प्रश्न उपस्थित केला. त्यावर बोलताना आयुक्तांनी सांगितले की, शिस्तभंग केल्यास कुणाचीही गय केली जाणार नाही. सांगवी येथे पोलिसांकडून चूक झाली तर त्यांच्यावरदेखील कारवाई करण्यात आली आहे. शहरात पोलीस गस्त वाढवून अशा प्रकारांना आळा घातला जात आहे.

### सीसीटीव्हीद्वारे कारवाई

» पिंपरी-चिंचवड शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. पिंपरी-चिंचवड शहरात ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्या आधारे देखील पोलिसांकडून कारवाई केली जात आहे. १ जानेवारी २०२४ पासून २६ मार्च २०२५ पर्यंत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या मदतीने एकूण ७५,२३७ कारवाया करण्यात आल्या आहेत. त्यातून एकूण ७,९६,३२,१०० रुपये इतका दंड वसूल करण्यात आला असल्याचे आयुक्त म्हणाले.

> पिंपरी-चिंचवड मध्ये कोणत्याही प्रकारच्या सार्वजनिक गैरवर्तणुकीस अजिबात स्थान नाही. नागरिकांनी निर्भीडपणे पोलिसांकडे तक्रार करावी. कोणीही असो कारवाई केली आणि यापुढेही निश्चित केली जाईल.
>
> - विनयकुमार चौबे, आयुक्त, पिंपरी-चिंचवड

# अण्णा बनसोडेंना उच्च न्यायालयाचे हजर राहण्याचे आदेश

## अण्णा बनसोडे यांच्या आमदारकीला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करणयात आली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार अण्णा बनसोडे यांची विधानसभा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. पण त्यांच्या या निवडीला दोन दिवस पूर्ण होत नाही तेच आता मुंबई उच्च न्यायालयाकडून बनसोडेंना हजर होण्याचे आदेश आले आहेत. कारण बनसोडे यांच्या आमदारकीला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करणयात आली आहे. त्यामुळे अण्णा बनसोडे यांची आमदारकी धोक्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

त्यामुळे आता विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांना बुधवारी, 2 एप्रिलला न्यायालयात हजर राहावे लागणार आहे. महाविकास आघाडीच्या उमेदवार सुलक्षणा शीलवंत-धर यांनी अण्णा बनसोडेंच्या आमदारकीला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.



त्यामुळे आता अण्णा बनसोडे यांच्या आमदारकीवर टांगती तलावर आल्याचे बोलले जात आहे. पण आमदार अण्णा बनसोडे यांची विधानसभेच्या उपाध्यक्षपदी दोन दिवसांपुर्वीच बिनविरोध निवड झाली. त्यानंतर आता मुंबई उच्च न्यायालयात ही याचिका दाखल करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) अण्णा बनसोडे हे सलग तिसऱ्यांदा विधानसभा निवडणुकीत आमदार पदी निवडून आले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक म्हणून अण्णा बनसोडे यांची ओळख आहे. तिसऱ्यांदा निवडून आल्यानंतर त्यांना मंत्रिपदाची अपेक्षा होती. मात्र, जादा इच्छूक आणि मंत्रिपदे कमी यामुळे महायुती सरकारमध्ये त्यांना मंत्रिपदं मिळाले नाही. मात्र, अजित पवारांनी त्यांना विधानसभेच्या उपाध्यक्षपदी संधी दिली आहे. याशिवाय विविध समित्यांवर त्यांना संधी देण्यात आली आहे, त्यामुळे अण्णांचे राष्ट्रवादी काँग्रेसमधील वजन वाढल्याचे चित्र आहे. अण्णा बनसोडे यांच्या आमदारकीला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करणयात आली आहे. त्यामुळे अण्णा बनसोडे यांची आमदारकी धोक्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

### न्यायालयात हजर राहण्याचे आदेश

» अण्णा बनसोडे यांनी विधानसभा निवडणुकीत नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप आहे. याच संदर्भातील याचिका महाविकास आघाडीच्या उमेदवार सुलक्षणा शीलवंत धर यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली आहे. या याचिकेवर न्यायमूर्ती गौरी गोडसे यांच्या एकलपीठापुढे याचिकेवर सुनावणी पार पडली. या सुनावणीनंतर बनसोडे यांना बुधवारी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# आंबेगावातील 9 गावांना टँकरने पाणीपुरवठा, उन्हाची तीव्रता वाढली

**आंबेगाव तालुक्यात दुष्काळाच्या झळा जाणवू लागल्या असून, पाणीटंचाईग्रस्त 9 ग्रावांसह वाड्या-वस्त्यांवर 10 टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे,**



**पिंपरी | प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यात दुष्काळाच्या झळा जाणवू लागल्या असून, पाणीटंचाईग्रस्त 9 ग्रावांसह वाड्या-वस्त्यांवर जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने आंबेगाव पंचायत समिती कार्यालय घोडेगावच्या वतीने 10 टँकरने पिण्यासाठी पाणीपुरवठा करण्यात येत आहे, अशी माहिती गटविकास अधिकारी प्रमिला वाळुंज यांनी दिली.

तालुक्यातील सातगाव पठार भागातील कारेगाव, पारगाव तर्फे खेड, कुरवंडी, निघोटवाडी, शिरदाळे, थुगाव, भावडी, लोणी, वडगाव पीर या गावांसह परिसरातील वाड्या-वस्त्यांमध्ये तीव्र पाणीटंचाई आहे. यातील 16 हजार 731 लोकसंख्येला पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शासकीय स्तरावर 10 पाण्याचे टँकर सुरू करण्यात आले आहेत.

यातील कारेगाव येथील कानिफनाथवस्ती, बेंदवस्ती, माळवस्ती, पारगाव तर्फे खेड येथील चिखलेवस्ती, पठारेवस्ती, मनकरवस्ती, घुलेवस्ती, बागलवस्ती, ढगे ठाकरवस्ती, निवळी, ठाकरवाडी, पवळेवस्ती, भागडेवस्ती, जाधववस्ती, चव्हाण पवारवस्ती, माळीमळा, भवानीनगर. कुरवंडी येथील मतेवाडी, गटेवाडी, कोंबडवाडी, दरावस्ती, वळणवस्ती, हरिजनवस्ती. निघोटवाडी येथील दस्तुरवाडी, कोळवाडी, आवळीवस्ती. थूगाव येथील सवाईमळा, नागूमळा, माळीमळा, कोल्हारवाडी, गणेशनगर, ठाकरवाडी.

भावडी येथील रानमळा, चक्कर वस्ती, नवलेमळा, कुदळेवस्ती, कातळेवस्ती, डोंगरवस्ती. लोणी येथील बांधणवस्ती, कौटकरवस्ती, लंकेवस्ती, खालचा गलठा, खंडागळेवस्ती, सावतामळा, शिवडीवस्ती, पैसावस्ती, बागवस्ती, डोंगरभाग आढाव थोरातवस्ती, वरचा गलठा. वडगाव पीर येथील पोखरकरमळा 2 व 3, सांडभोरवस्ती, आदक भानभाववस्ती, पाटीलमळा, पोखरकरमळा, इनामदारवस्ती, जाधववस्ती, आदकवस्ती, गुळवेवस्ती, वाळुंजवस्ती येथे तसेच शिरदाळे येथे टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. यातील पारगाव तर्फे खेड येथे 2 टँकर व इतर 8 ग्रामपंचायतींना प्रत्येकी 1 टँकर सुरू आहे.

तिरपाड, मांदळेवाडी, चिखली, धामणी, राजेवाडी येथील ग्रामपंचायतींचेही प्रस्ताव मंजुरीसाठी आले आहेत. लवकरच त्या ठिकाणी पाण्याचे टँकर चालू करण्यात येणार आहेत. ज्या गावांना पाण्यासाठी दुष्काळी स्थिती निर्माण झाली आहे, त्यांनीही आपले प्रस्ताव आंबेगाव पंचायत समिती कार्यालय घोडेगाव येथे द्यावेत, असे आवाहन सहायक गटविकास अधिकारी अर्चना कोल्हे यांनी केले आहे.

### बाजारपेठेत शुकशुकाट

» दिवसभर उन्हाच्या झळा सोसण्याची वेळ लोकांवर आली आहे. त्याचबरोबर उन्हाची तीव्रता वाढल्याने ग्रामीण भागातील नागरिक घराच्या बाहेरही पडत नाहीत. त्यामुळे रस्ते व गावातील पेठांत शुकशुकाट जाणवू लागला आहे. दुसरीकडे वाढत्या उष्णतेमुळे विविध प्रकारच्या शीतपेयांना मागणी वाढलेली आहे. त्यामुळे रसवंतिगृह व हॉटेल येथे गर्दी दिसू लागली आहे, तर कुल्फी, गारेगार यांचीही मागणी वाढली आहे. उन्हातून घरी आल्यावर गार पाणी व थंड पेय जास्त घेऊ नये, असा सल्ला पारगाव येथील डॉ. शिवाजी थिटे यांनी दिला आहे.

### उन्हाची तीव्रता वाढली

» आंबेगाव तालुक्यात उन्हाची तीवव्रता वाढत असून, पारा 2 दिवसांत 40 अंशांच्या उंबरठ्यावर पोहचला आहे. उन्हाची दाहकता वाढल्याने नागरिकांना त्रासही सहन करावा लागत आहे.आंबेगावच्या पूर्व भागातील लोणी, धामणी, वडगावपीर, मांदळेवाडी, लाखणगाव, काठापूर, जारकरवाडी, पोंदेवाडी आदी गावांमध्ये कमाल तापमान 40 अंश सेल्सिअसपर्यंत पोहचले आहे. जिल्ह्यात या वर्षी हिवाळ्यात थंडी अधिक प्रमाणात जाणवलीच नाही.

### कमाल तापमानात वाढ

» उन्हाळ्याला लवकर सुरुवात झाली. कारण फेब्रुवारीतच जिल्ह्यातील कमाल तापमान 35 अंशांवर गेले होते, तर मार्च महिना सुरू झाल्यानंतर उन्हाची तीव्रता आणखी वाढली आहे. मागील काही दिवसांत दुपारच्या सुमारास उन्हाच्या तीव्र झळा सोसाव्या लागत आहेत. अशातच पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात कमाल तापमानात वाढ होताना दिसून येत आहे.

# कर्जमाफीबाबत घोर निराशा; थकीत आकडे शोधण्यासाठी शेतकरी बँकांमध्ये

**राज्य विधिमंळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकरी कर्जमाफीचा निर्णय होऊन शेतकऱ्याना दिलासा मिळेल, या आशेवर बसलेल्या शेतकऱ्याची पुरती निराशा झाली आहे.**




**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्य विधिमंळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकरी कर्जमाफीचा निर्णय होऊन शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, या आशेवर बसलेल्या शेतकऱ्यांची पुरती निराशा झाली आहे. मागील वर्षांतील कर्जातील थकबाकीसह बँकांची कर्जाची रक्कम जाणून घेण्यासाठी शेतकरीवर्ग बँकांची पायरी चढून कर्ज, व्याज, दंड व्याजाची आकारणी घेण्याची लगबग जिल्हा बँक तसेच राष्ट्रीयीकृत बँकांत पहायला मिळत आहे.

विधानसभा निवडणुकीत महायुतीने शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली होती, मात्र हिवाळी अधिवेशनात निर्णय न झाल्याने अर्थसंकल्पीय अधिवेशनात निर्णय होईल, या सोशल मीडियाच्या प्रबोधनात शेतकरी अडकत कर्जमाफीच्या प्रलोभनामुळे कर्जमाफीकडे डोळे लावून बसला होता. मात्र अधिवेशन संपूनही निर्णय न झाल्याने कर्जमाफीच्या आशेवर बसलेला शेतकरी बँकांच्या पायऱ्या चढू लागला आहे.

शेतकऱ्यांना शासनाकडून यापूर्वी 2007, 2014 तर 2019 या आर्थिक वर्षात कर्जमुक्ती दिली आहे. तसेच 2019 च्या निवडणुकीत निवडणुकीनंतर दीड लाखापर्यंत मागील तीन वर्षांची कर्जमाफी दिली आहे. अशीच माफी 2025 ला होईल, अशा राज्यकर्त्यांच्या आशेवर शेतकऱ्यांना सोशल मीडियात चर्चासत्रांत प्रलोभने दाखविली जात होती. मात्र आता निवडणूक झाली, सरकारही स्थापन झाले मात्र घोषणा न झाल्याने शेतकऱ्यांच्या पदरी घोर निराशा पडली आहे.

### मध्यम मुदतीच्या कर्जाचा भरणा नाही

» कर्जमाफीच्या अपेक्षेने मध्यम व आर्थिक वर्षातील पीककर्जे तसेच इतर कर्जे भरण्यासाठी शेतकऱ्यांनी निरुत्साह दाखविला आहे. 2019 नंतर कर्जमाफी व प्रोत्साहनपर रक्कम मिळाल्याने शेतकऱ्यांनी त्यानंतर कर्जे भरली नसल्याची स्थिती आहे. मात्र आता कर्जमाफी न मिळाल्याने व्याज व दंडासहीत कर्जे भरावी लागणार आहेत.

### वीजमाफी मिळेल म्हणून शंका

» शेतकऱ्यांना कर्जमाफी प्रयोगानंतर वीजबिल माफी मिळालीआहे. 2014 पासून शेतकऱ्यांना वीज बिलात सवलत मिळाली आहे. मात्र, राज्याची आर्थिक स्थिती तसेच वीज नियामक मंडळाकडे घरगुती, कृषी, वाणिज्य व औद्योगिक बिलांचा थकबाकी आकडा 1 लाख कोटींच्या घरात जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे वीजबिल माफीवर सरकार फेरविचार करण्याची शक्यता आहे.